# प्रेस नोट

दिनांक १३.११.२०१९

आरोपी : आनंद अनिलराव कुलकर्णी, वय ३० वर्षे, धंदा नौकरी - ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय आहेरवडगाव, ता.जि. बीड वर्ग ३, यांना ७,००० रु लाच स्विकारतांना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड. |
| गुन्हा नोंद क्रमांक | पोस्टे शिवाजीनगर बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया चालु आहे. |
| कलम | कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (सुधारित अधिनियम २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आनंद अनिलराव कुलकर्णी, वय ३० वर्षे, धंदा नौकरी - ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय आहेरवडगाव, ता.जि. बीड |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७०००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांनी दि.१३.११.२०१९ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडीलांचे नावे मौजे आहेरवडगाव येथील गट क्रमांक १२९ मधील ४० * ५० व १६ * २० या जागेची नोंद ग्राम पंचायत ला घेवुन पी.टी. आर. उतारा देण्यासाठी ग्रामसेवक आनंद कुलकर्णी यांनी ७,०००/- रूपये लाचेची मागणी करीत आहेत. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.१३.११.२०१९ रोजी लाच मागणीची खात्री केली असता ग्रामसेवक आनंद कुलकर्णी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी ७,००० रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्यावरून आज दि.१३.११.२०१९ रोजी शासकीय विश्रामगृहासमोरील रस्त्यावर बीड येथे लाचेच्या सापळयाचे आयोजन करून लाच रक्कम ७,०००/- रूपये स्विकारतांना आरोपी आनंद अनिलराव कुलकर्णी, वय ३० वर्षे, धंदा नौकरी - ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय आहेरवडगाव, ता.जि. बीड वर्ग ३ यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द पोस्टे शिवाजीनगर बीड येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदरची कारवाई मा.श्री. अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, मा.डॉ. अनिता जमादार, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.राजकुमार पाडवी, प्रभारी पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि बीड, श्री.रविंद्र परदेशी, पोलीस निरीक्षक, पोकॉ गदळे, वीर, चापोह सयद ला.प्र.वि.बीड यांनी केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड
संकेतस्थळ :-**acbwebmail@mahapolice.gov.in**
ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in** 2):-**dyspacbbeed@gmail.com**
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**
टोल फ्रि क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :-०२४४२-२२२६४९
व्हॉटस अप क. :-९९३०९९७७००

( राजकुमार पाडवी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.